# जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन - २००९

**जाहिरात क्रमांक आस्था-२/पोभ/मपु/२००९ ठिकाण : नांदेड दि. २३/०७/२००९**

नांदेड जिल्हा पोलीस घटकात दि. १०/०८/२००९ रोजी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे. उमेदवारांने या कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आवेदन अर्ज खालील सुचना १ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येतील. आवेदन अर्ज उमेदवाराने रु. ५०/- ची इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट "P.A. TO S.P. NANDED" या नावाने जमा केल्यानंतर देण्यात येतील. विहीत आवेदन अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह व्यक्तिशः पोलीस मुख्यालय, कवायत मैदान, नांदेड या ठिकाणी दि. १०/०८/२००९ रोजी सकाळी ०७.०० वाजेपासून दुपारी १२.०० वाजेपर्यंत येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

नांदेड जिल्हा पोलीस घटकात खालील दर्शविल्याप्रमाणे पोलीसांची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

**१) पोलीस शिपाई :**

| पद | अजा | अज | विमाप्र | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४६ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | ४६ | ४६ |

**२) बॅंडस्‌मनची पदे निरंक.**

- **खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल यांचेकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/३/१९९९)**

**टिप :** वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.**

**वेतनश्रेणी :** शासन वित्तविभाग अधिसूचना क्र. वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा - ९, दि. २२/४/०९ अन्वये पोलीस शिपाई पदाकरिता मंजुर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीनुसार अनुज्ञेय वेतन व भत्ते. शासन निर्णय अं.नि.ओ. १००५५/१२६/सेवा-४,दि. ३१/१०/२००५ अन्वये नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या पोलीस शिपायांस "परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू ठरेल.

**वयोमर्यादा :** दि. ३१/०७/२००९ रोजी वय १८ वर्षे पूर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**शैक्षणिक अर्हता :** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१ ) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारीरिक पात्रता : महिला :** किमान उंची : १५५ से.मी.
**पुरुष :** किमान उंची : १६५ से.मी.
छाती : न फुगवता ७९ सें.मी. (न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा.).

**चाचणी :** शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल.

शारीरिक चाचणी खालील प्रमाणे राहील :

पुरूष : (१) १०० मिटर्स धावणे, (२) ८०० मिटर्स धावणे, (३) पुल अप्स (१०), (४) लांब उडी, (५) गोळा फेक.
महिला : (१) २०० मिटर्स धावणे, (२) ३ किमी चालणे (३) लांब उडी, (४) गोळा फेक (४ कि.ग्रा.)

लेखी चाचणी पुढील प्रमाणे राहील : (१) अंकगणित (२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी (३) मराठी भाषेत निबंध लेखन

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद :** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या अनुसूचित जमातीसाठी व नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत / गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतात.

तसेच सदर महिला व पुरूष उमेदवारांना उंची मध्ये २.५ सें.मी. सुट देय राहिल आणि पुरूष उमेदवारांच्या छातीच्या मोजमापात सूट देय राहील.
**(टिप :- ही तरतुद शासन निर्णय क्र. एन ए एक्स-२००४/प्रक्र ४८/विशा-१ ब, दि. ७/१२/२००४ च्या नुसार घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागामध्ये (जिल्हयांमध्ये) होणाऱ्या पोलीस भरतीसाठी आहे. इतर ठिकाणी ही सुट मिळणार नाही. तसेच असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाही.**

या कार्यालयाचे परिपत्रक दि. ४/१०/२००७ नुसार आदीवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार जात पडताळणी समितीकडे प्रकरण प्रलंबित असेल तर सहा महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले जाईल. असे हमीपत्र उमेदवारांकडून घेऊन नियुक्ती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.)

**बँडस्मन :** बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बॅण्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. बँडस्मन पदासाठी १० वी उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतील.

तसेच सदर उमेंदवारांना उंची मध्ये २.५ से.मी. व छातीमध्ये २ से.मी. न फुगविता / १.५ से.मी. फुगवून इतकी सूट देय राहील. सदर सवलत देण्याचे अधिकार पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**महिलांसाठी आरक्षण :** उपरोक्त नमूद घटकातील पदांमध्ये शासन निर्णयाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण असून एखाद्या संवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.-४१५/का-२, दि.२५/५/२००१ निर्गमित केलेल्या निर्णयानुसार महिलांसाठी राखीव असलेल्या ३०% समांतर आरक्षणाकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगळून) नॉन क्रिमीलेअर प्रमाण पत्र भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**गृहरक्षक दल (होमगार्ड) आरक्षण:** एकूण पदांच्या ५% इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवारांची भरतीच्या दिनांका पूर्वी अथवा भरतीच्या नियोजित दिनांकापर्यंत गृहरक्षक दलामध्ये कमीत कमी ३ वर्षे सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण :** एकूण पदांच्या १५% इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलातील जितकी सलग सेवा (सहा महिन्यांपेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्षे अधिक ३ वर्षे इतकी सवलत देय राहील.

**प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त आरक्षण :** एकूण पदाच्या ५% **(शा. नि. क्र. ईक्यूआर-२००६/प्र.क्र.१०४/भुपूक, दि. १७/४/२००७ अन्वये ३% भूकंपग्रस्त आणि २% धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त राखीव राहतील)** इतके समांतर आरक्षण पदे ही धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त प्रवर्गातून भरण्यात येतील. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

**खेळाडू उमेदवार :** एकूण पदाच्या घटकनिहाय ५% पदे खेळाडू उमेदवारातून भरण्यात येतील खेळाडूंबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानुसार भरण्यात येतील. सदरची सूट फक्त पुढे नमूद क्रिडा कामगिरी करणाऱ्या खेळाडूसाठीच देय राहील **(१) राज्यस्तर (आंतरजिल्हा) पदक विजेता (२) अखील भारतीय आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व.**

**खेळाची नावे :**

| | | |
|---|---|---|
| १) आर्चरी (धनुविद्या) | २) ॲथलेटिक्स व क्रॉस कन्ट्री | ३) ॲक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| ४) बॅडमिंटन | ५) बॉक्सिंग | ६) बास्केटबॉल |
| ७) जिम्नॅस्टिक्स | ८) हॅण्डबॉल | ९) खो-खो |
| १०) ज्युडो | ११) कबड्डी | १२) रोवींग |
| १३) लॉन टेनिस | १४) शूटींग | १५) वेटलिफ्टिंग |
| १६) टेबल टेनिस | १७) व्हॉलिबॉल | १८) तायक्वांदो |
| १९) कुस्ती | २०) हॉकी | २१) बिलीयर्डस व स्नूकर |
| २२) फूटबॉल | २३) कराटे | २४) पॉवर लिफ्टिंग |
| २५) बॉडी बिल्डिंग | २६) क्रिकेट | २७) कॅनोईंग-कयाकिंग (होडी वल्हविणे) |
| २८) रग्बी | | |

तसेच पुरूष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी. इतकी सूट देय राहील.

**अर्जदारासाठी आवश्यक सूचना :**

१) "आवेदन अर्ज" हे खालील ठिकाणी दि. २८/७/२००९ ते ८/८/२००९ पर्यंत १०.०० ते १७.३० वाजेपर्यंत वितरीत केले जातील

**ठिकाणांची नावे:**

| | | |
|---|---|---|
| १) पो.स्टे. भाग्यनगर | २) पो.स्टे. शिवाजीनगर | ३) पो.स्टे.वजीराबाद |
| ४) पो.स्टे. इतवारा | ५) पो.स्टे. नांदेड ग्रामीण | ६) पो.स्टे. अर्धापूर |
| ७) पो.स्टे. भोकर | ८) पो.स्टे. बिलोली | ९) पो.स्टे. देगलूर |
| १०) पो.स्टे. धर्माबाद | ११) पो.स्टे. हिमायतनगर | १२) पो.स्टे. हदगांव |
| १३) पो.स्टे. कंधार | १४) पो.स्टे. किनवट | १५) पो.स्टे. लोहा |
| १६) पो.स्टे. मुखेड | १७) पो.स्टे. माहूर | १८) पो.स्टे. मुदखेड |
| १९) पो.स्टे. नायगांव | २०) पो.स्टे. उमरी | २१) पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड |

२) “आवेदन अर्ज” जमा करतांना रू. ५०/- चा इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट घटक प्रमुखांच्या नावाने देण्यात यावा.

(उदाहरणार्थ : पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास “पोलीस आयुक्त, पुणे शहर” यांच्या नावाने किंवा पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास “पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण” यांच्या नावाने किंवा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट १, पुणे यांच्या कार्यकक्षेतील पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास “समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १, पुणे ”यांच्या नावाने इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट जमा करावा)

३) अर्जदाराने अर्जासाबत खालील (लागू असलेल्या) प्रमाणपत्राची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शाळा सोडल्याचा दाखला
२) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक
३) शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००८/प्रक्र २४२/०८/१६-ब, दि. २२/९/२००८ नुसार उमेदवाराने नियुक्ती झाल्यानंतर जात प्रमाणपत्राची वैधता ६ महिन्यांत सादर करणे आवश्यक राहील
४) प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्र.
५) अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र
६) सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटी नुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमीलियर ) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र.
७) विविध आरक्षण प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी समंधीत प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

प्रमाणपत्राच्या छाननीच्या वेळी उमेदवारांनी उपरोक्त मूळ (Original) प्रमाणपत्रे दाखविणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करणेस पात्र राहतील

५) सदर पोलीस भरतीची विस्तृत माहिती www.maharashtra.gov.in/ www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डवर उपलब्ध राहील.

६) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

७) पोलीस भरतीच्या प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

८) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-
**( सत्यनारायण )**
पोलीस अधिक्षक, नांदेड